PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Shejari shejari
Year: 1990

Song: Ek mulga tujhya sarkha
Lyricist: Pravin Davane

एक मुलगा तुझ्या सारखा
एक मुलगा तुझ्या सारखा
स्वप्नी पाहिला
इंद्रधनूचा तरंग सुंदर हृदयी जागला
एक मुलगी तुझ्या सारखी
स्वप्नी पाहिली
प्रेम करावे ज्या वळणावर तेथे भेटली

स्वप्नामध्ये तुझ्या आणखी
घडले सांग काय
अनुभवले जे शब्दावाचून
सांगू कसे मी हाय
डोळ्यामधल्या आरशात मी
हळूच वाचून घेतो
मनोगताला पंख लावता
जीव पाखरू होतो
जीव पाखरू होतो
आ आ आ आ...
प्रिया प्रिया प्रिया प्रिया
कुणी केली ही जादू तुझ्यावर
सांगशील का मला
एक मुलगा तुझ्या सारखा
एक मुलगा तुझ्या सारखा
स्वप्नी पाहिला
इंद्रधनूचा तरंग सुंदर हृदयी जागला
एक मुलगी तुझ्या सारखी
स्वप्नी पाहिली
प्रेम करावे ज्या वळणावर तेथे भेटली

प्रेम जडावे तुझे तिच्याशी
असे तिच्यातच काय
जाणून घेवून उगीच तू ही
करशील सांग काय
अधीर मनाला उगीच नको रे
झुरत असा तू ठेवू
अधरावरती नाव लाडके
हळूच लागले येवू
हळूच लागले येवू
आ हा हा आ...
प्रिये प्रिये प्रिये प्रिये
छंद तुझ्या नावाचा
मी ही हृदयी कोरला
प्रेम करावे ज्या वळणावर तेथे भेटला
एक मुलगी तुझ्या सारखी
स्वप्नी पाहिली
प्रेम करावे ज्या वळणावर तेथे भेटली
एक मुलगा तुझ्या सारखा
स्वप्नी पाहिला
इंद्रधनूचा तरंग सुंदर हृदयी जागला
एक मुलगी तुझ्या सारखी
एक मुलगा तुझ्या सारखा
एक मुलगी तुझ्या सारखी
एक मुलगा तुझ्या सारखा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*